भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५ /०१/२०१७

१) महाराष्ट्र जीवन प्राधीकरण विभागाचे पाणीपुरवठा योजनेमधील पाईप लाईप साहीत्याची चोरी. :–

दिनांक २२/१२/२०१६ ते ३/०१/२०१७ चे रात्री ते दिवसा दर. यातील कोणीतरी अज्ञात चोराने महाराष्ट्र जीवन प्राधीकरण विभागाव्दारे पाणीपुरवठा योजनेचे पाईप लाईनचे पाईपला लावलेले ८० एमएम बीडाचे एअर होल्ड २ नग कि. ६,१५०/–रु. , ३५० एमएम बिडाचे स्क्रु होल्ड १ नग कि. २३,०००/–रु. चा असा एकुण २९,१५०/–रु. चा माल कोणी नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी लक्ष्मण निनु चोपडे वय ४९ वर्ष, रा. गोबरवाही यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९ भादवी .अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

२) घरातील सोन्याचे दागीने व नगदी पैश्याची चोरी. :–

दिनांक ०३/०१/२०१७ चे १८.३० वा. दर. यातील फिर्यादी सौ. कांचन ईस्तारी गभणे वय ३५ वर्ष, रा. लाखनी हिची मुलगी दुर्गा गभणे वय १६ वर्ष, ही घरी हजर असतांना यातील आरोपी हे फिर्यादीचे घरी जावुन आमचा मोबाईल तुमच्या घरी राहीला असे म्हणुन फिर्यादीच्या घराची शोधाशोध केली व कपाटामध्ये ठेवलेले २ सोन्याचे गोप वजन अंदाजे २२ ग्रॅम, १ सोन्याची अंगठी वजन अंदाजे ०७ ग्रॅम व दिवानचे गादीचे खाली ठेवलेले नगदी १०,०००/–रु. असा एकुण ६४,०००/–रु. चा माल दोन्ही संशयीत आरोपीतांनी चोरुन नेल्याने फिर्यादीयांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखीन येथे कलम ३८० भादवी .अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

३) दारूडया वाहन चालकावर कारवाई . :–

दिनांक ०४/०१/२०१७ चे १७.४५ वा. दर. यातील आरोपीने आपल्या ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३६ टी ६३३१ चा चालक हा दारू पीवुन दारू चे नशेत कलेक्टर चौक येथे चालवीतांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ ॲनालायझर मशीन द्वारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोशी. चकोले वा. नी.शा पो.स्टे. भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. साबळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

४) अनोळखी इसमाचा उपचारा दरम्यान मृत्यु. :–

दिंनाक ०३/०१/२०१७ रोजी २२.३० वा. दर. यातील अनोळखी मृतक वय अंदाजे ५० वर्ष, वयोगटातील मृतक हा वार्ड क्रमांक ०९ मध्ये भरती झाला होता तो उपचारा दरम्यान दि. ३/०१/२०१७ चे २२.३० वा मरण पावल्याने पोस्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केला. पुढील तपास पोहवा. कन्नाके पो. स्टे. भंडारा हे करीत आहे.

५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–

दिनांक ०४/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ८६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी, तिन सिटर वाहनांवरती १२ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७४ केसेस करण्यात आलेल्या आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.